लोकमत

## रुग्णाची भावना : ससून रुग्णालयात यकृत प्रत्यारोपण केंद्राचे उद्घाटन

# ‘ससून’मधील केंद्रामुळे पुन्हा जगण्याची संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : यकृत प्रत्यारोपण करण्याचा सल्ला दिल्यानंतर आम्ही अनेक रुग्णालयांत फिरलो; पण त्यासाठी लागणारा खर्च ऐकून जगण्याची आशा सोडली होती. मात्र, ससूनमध्ये हे प्रत्यारोपण करण्यात येणार असल्याबाबत माझ्या मुलाने व सुनेने वाचले आणि आम्ही संपर्क केला. ससूनमधील डॉक्टर आणि नर्सेस यांच्या रुपाने मला देव भेटला. पुन्हा जगण्याची संधी मिळाली, अशी भावना ससूनमधील यकृत प्रत्यारोपण केंद्रातील पहिले रुग्ण बाबासो जाधव यांनी व्यक्त केली.

फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे संस्थापक प्रल्हाद पी. छाब्रिया यांच्या तिसऱ्या स्मृतिदिनानिमित्त फिनोलेक्स व मुकुल माधव फाउंडेशनच्या १ कोटी ३० लाख रुपयांच्या अर्थसाहाय्यातून ससून रुग्णालयात उभारण्यात आलेल्या यकृत प्रत्यारोपण केंद्राचे उद्घाटन प्रसिद्ध न्यूरोफिजिशियन डॉ. आर. एस. वाडिया व ससून रुग्णालयात यकृत प्रत्यारोपण झालेले पहिले दोन रुग्ण बाबासो जाधव आणि सणस यांच्या हस्ते झाले. या वेळी फिनोलेक्सचे अध्यक्ष प्रकाश छाब्रिया, मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया, होप फाउंडेशनच्या अध्यक्षा अरुणा कटारा, मुंबईतील जे. जे. रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले, ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर नणंदकर, डॉ. शीतल धडफळे, डॉ. कमलेश बोकील, डॉ. संजीव ठाकूर आदी उपस्थित होते.



ससूनमधील यकृत प्रत्यारोपण केंद्राचे उदघाटन करताना डॉ. आर. एस. वाडिया, रितू छाब्रिया आदी मान्यवर.

- डॉ. आर. एस. वाडिया म्हणाले, ससूनमध्ये येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला बरा होऊन घरी जाण्याची आशा असते. येथे कार्यरत डॉक्टर आणि सर्वच स्टाफने रुग्णाला तो विश्वास दिला पाहिजे.
- रितू प्रकाश छाब्रिया म्हणाल्या, आर्थिकदृष्ट्या कमकुवत रुग्णांना चांगल्या आरोग्यसुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी मुकुल माधव फाउंडेशन सातत्याने प्रयत्न करीत आहे. नवजात शिशू अतिदक्षता विभाग, एन्डोस्कोपी केंद्र, लेझर डेंटल युनिट, विश्रांतीकक्ष अशा सुविधा उपलब्ध केल्यानंतर आता यकृत प्रत्यारोपण केंद्र उभारले आहे. यामुळे गरजू रुग्णांना अल्पदरात यकृत प्रत्यारोपण शक्य होईल.